**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनि**

**दिनांक:06.06.2024** **वार:गुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एनडीएच्या नेतेपदी निवड झाल्यानंतर केंद्रात नवीन सरकार स्थापनेसाठी प्रक्रिया सुरू,
2. इंडी आघाडीचीही वर्तमान राजकीय स्थितीवर चर्चा,
3. लोकसभा निवडणुकीत बहुमत मिळवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं जगभरातून अभिनंदन
4. भारतीय लष्कराची निवृत्तीवेतन धारकांसाठीची स्पर्श सेवा आता ठराविक बँकांमध्येही उपलब्ध होणार
5. भारताचा रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू ऍब्डेन फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत दाखल आणि
6. वीस षटकांच्या आयसीसी विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाची विजयी सुरुवात

**मोदी-नेता**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं केंद्रात नवीन सरकार स्थापनेसाठी प्रक्रिया सुरू केली आहे. सत्ताधारी एनडीएने सर्वानुमते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कालच्या बैठकीत नेता म्हणून निवड केल्यानंतर सरकार स्थापनेची तयारी सुरू झाली. गेल्या दहा वर्षात मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारमुळे देशाचा प्रत्येक क्षेत्रात सर्वंकष विकास झाल्याचा ठराव काल एनडीएच्या नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत मंजूर करण्यात आला. देशातल्या जनतेनं सलग तिसऱ्या वेळी सक्षम नेतृत्वाला बहुमतानं निवडून दिल्याचंही या ठरावात म्हटलं आहे. सरकारला मतदारांनी सलग तिसऱ्यांदा दिलेली संधी ही ऐतिहासिक घटना असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी या बैठकीत म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीला भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा, केंद्रिय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह यांच्यासह तेलगू देसम पक्षाचे प्रमुख एन. चंद्राबाबू नायडू, संयुक्त जनता दलाचे प्रमुख नितीश कुमार, शिवसेना नेते एकनाथ शिंदे, लोकजनशक्ती पक्षाचे प्रमुख चिराग पासवान, अपना दलाच्या नेत्या अनुप्रिया पटेल, आरएलडी पक्षाचे प्रमुख जयंत चौधरी, धर्मनिरपेक्ष जनता दलाचे एच. डी कुमारस्वामी, हिंदुस्तान आवामी मोर्चाचे प्रमुख जीतनराम मांझी आणि जनसेना पक्षाचे पवन कल्याण यांच्यासह एनडीए चे अन्य नेते या बैठकीला उपस्थित होते.

**इंडी-बैठक**

इंडी आघाडीतल्या घटक पक्षांच्या नेत्यांचीही काल नवी दिल्लीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी बैठक झाली. यामध्ये देशातल्या सध्याच्या राजकीय स्थितीबाबत चर्चा झाल्याचं खरगे यांनी या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**जगभरातून-शुभेच्छा**

जगभरातल्या प्रमुख नेत्यांनी सलग तिसऱ्या वेळी लोकसभा निवडणुकीत यश मिळाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी पंतप्रधानांसह एनडीएचं अभिनंदन करुन दोन्ही देशातले मैत्रीपूर्ण संबंध आणखी वृद्धिंगत होतील असं आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**युएई-मोदी**

संयुक्त अरब अमीरातीचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांनीही मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. भारताला विकासाच्या वाटेवर आणखी पुढे नेण्यासाठी शुभेच्छा असं नाह्यान यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**स्पर्श-सेवा**

संरक्षण मंत्रालयाच्या लेखा विभागानं बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया आणि उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकेसोबत काल नवी दिल्लीत एक सामंजस्य करार केला. या बँकांमध्ये संरक्षण मंत्रालयाच्या निवृत्तीवेतन प्रशासन यंत्रणेची अर्थात स्पर्शची सेवा केंद्रं सुरू करण्याबाबतचा हा करार आहे. स्पर्श हे संरक्षण मंत्रालयानं संरक्षण विभागातल्या निवृत्तीवेतनधारकांसाठी सुरू केलेलं पोर्टल आहे. तांत्रिक अडचणींमुळे ज्या दुर्गम भागातल्या निवृत्तीवेतनधारकांना या पोर्टलचा लाभ घेता येत नाही त्याच्यासाठी ही बँक सुविधा सुरू केली असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**निर्यातदार**

व्यापार सुलभतेसाठी केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळानं ड्रॉ बॅक रक्कम इलेक्ट्रॉनिक पद्धतीनं थेट निर्यातदाराच्या बँक खात्यात वितरित करण्यास कालपासून सुरुवात केली आहे. ड्रॉ बॅक रक्कम म्हणजे विशेषत: नंतर निर्यात केलेल्या किंवा निर्यातीसाठी उत्पादन तयार करण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या आयाती उत्पादनावरील शुल्काचा परतावा असतो. या सुविधेमुळे वितरण यंत्रणेतील मानवी हस्तक्षेप दूर होऊन रक्कम भरण्यासाठी लागणारा वेळ कमी होणं आणि पारदर्शकता वाढणं अपेक्षित आहे..

**त्रिशक्ती प्लास्टिक**

भारतीय लष्कराच्या त्रिशक्ती तुकडीनं काल अनेक पर्यावरणपूरक उपक्रम सुरू करुन जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. याअंतर्गत सिक्कीममध्ये चंगू इथं प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर प्रकल्प सुरू करण्यात आला. या प्रकल्पात प्लास्टिकचा पुनर्वापर करुन रस्तेबांधणी तसंच विटा बनवण्यासाठीचा कच्चा माल तयार केला जाणार आहे.

**हवा-जागृती**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राजधानी दिल्ली परिक्षेत्राच्या हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगानं राज्य व्यापार महामंडळाच्या इमारतीतल्या विविध कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी जनजागृती मोहीम राबवली. जमिनीचा कस कायम राखणं, वाळवंटीकरण रोखणं आणि दुष्काळाचा सामना या संकल्पनेवर या मोहीमेचा भर होता. यामध्ये पथनाट्य, गाणी आदींद्वारे जनजागृती करण्यासह वृक्षारोपणही करण्यात आलं.

**भारतीय नौदल-पर्यावरण**

2024 च्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, भारतीय नौदलानं जमिनीचा कस कायम राखणं, वाळवंटीकरण रोखणं आणि दुष्काळाचा सामना या जागतिक संकल्पनेनुसार पर्यावरणविषयक कामांप्रती आपल्या वचनबद्धतेची पुष्टी केली आहे. हरित उपक्रमांद्वारे भारतीय नौदलानं अक्षय ऊर्जा आणि शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वपूर्ण उपाययोजना हाती घेतल्या आहेत. MISHTI कार्यक्रमांतर्गत वृक्ष आणि खारफुटीची लागवड, समुद्री शैवाल लागवड आणि कोरल रीफ सर्वेक्षण यांसारख्या प्रकल्पांद्वारे, भारतीय नौदल सरकारी संस्था आणि पर्यावरण-जागरूक संस्थांसोबत सहयोग करत आहे. नौदलाची एचसीएल फाउंडेशन आणि द हॅबिटॅट्स ट्रस्टसोबतची भागीदारी किनारपट्टीच्या परिसंस्थेचे पुनरुज्जीवन आणि सागरी प्रजातींच्या संवर्धनावर लक्ष केंद्रित करत आहे. पर्यावरणासाठी जीवनशैली म्हणजेच LiFE उपक्रमाच्या समर्थनार्थ, सौरऊर्जेचा अवलंब, ई-वाहन प्रोत्साहन, जलसंवर्धन आणि नवीन इमारतींसाठी गृह-3 नियमावलीचं पालन यांचा समावेश आहे. पुनीत सागर अभियान मोहिमेमध्ये प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापनावर भर देत किनारपट्टीच्या स्वच्छतेवर प्रकाश टाकण्यात आला आहे. हायड्रोजन एस्पिरेशन आणि डिझेल उत्सर्जन कमी करणारी उपकरणे यांसारख्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचीही चाचणी घेतली जात आहे.

**ओडिशा-हत्ती**

ओडिशात गेल्या सात वर्षांत हत्तींच्या लोकसंख्येत किरकोळ वाढ झाली आहे. अखिल ओडिशा हत्ती गणना-2024 अहवालानुसार, 38 वन विभागांमध्ये 2,098 हत्तींची गणना करण्यात आली. 13 प्रभागात हत्ती आढळले नाहीत. 239 जंबोंसह

ढेंकनाल वनविभागानं राज्यातील हत्तींची सर्वाधिक संख्या नोंदवली आहे. वन विभागानं 22 ते 24 मे या कालावधीत राज्यातील 28 जिल्ह्यांतील 48 विभागांमध्ये हत्तींच्या हालचालींची माहिती असणाऱ्या भागात तीन दिवसांची गणना केली. 5 हजार 700 हून अधिक वन विभागाचे कर्मचारी आणि अनेक स्वयंसेवी संस्था, संशोधन अभ्यासक आणि शिक्षणतज्ज्ञांनी या सरावात भाग घेतला.

**सुनिता विल्यम्स**

भारतीय वंशाची एकोणसाठ वर्षीय सुनिता विल्यम्स बोईंग स्टारलायनरच्या पहिल्या मानवी मोहिमेत अंतरिक्षात प्रवास करणारी पहिली अंतराळवीर ठरली आहे. सुनितासोबत 61 वर्षांचे बच विलमोर देखील असून हे दोघे आठवडाभर अंतरिक्ष स्थानकावर राहिल्यानंतर पृथ्वीवर परत येतील.

**नेमबाजी**

म्युनिक इथं झालेल्या नेमबाजीच्या विश्वकरंडक स्पर्धेत भारताच्या सरबजोत सिंगनं पुरुषांच्या 10 मीटर एअर पिस्टल प्रकारात अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. महिलांच्या 50 मीटर रायफल 3 पोझिशन्स प्रकारात भारताच्या अंजुम मौद्गिल, सिफ्त कौर शर्मा आणि आशी चौकसी यांनी बाद फेरीत विजय मिळवून पुढची फेरी गाठली. चैन सिंग, स्वप्नील कुसळे आणि ऐश्वर्य प्रताप सिंग तोमर यांनीही 3 पोझिशन्स प्रकारात पुढच्या फेरीत प्रवेश केला.

**बॅडमिं□न**

इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी. व्ही. सिंधूला काल पहिल्याच फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. चायनीज तैपेईच्या हू वेन ची हिनं सिंधूवर 21-15, 15-21, 21-14 अशा गेम्समध्ये विजय मिळवला. दरम्यान महिला दुहेरीत अश्विनी पोनप्पा आणि तनिषा क्रस्टो या जोडीनं दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे.

**उत्तरखंड-ट्रेकर्स**

कर्नाटकातील नऊ ट्रेकर्सचा उत्तराखंडमधील सहस्त्र तालाजवळ मृत्यू झाला. 22 सदस्यांच्या गटातील नऊ ट्रेकर्सचा मंगळवारी सहस्त्र तालवरून परतत असताना वाईट हवामानामुळे वाट चुकल्याने त्यांचा मृत्यू झाला. विविध आपत्ती निवारण पथकांनी संयुक्तपणे आकाशातून तसंच जमिनीवर शोध मोहीम राबवून 13 ट्रेकर्सची सुटका केली आहे. सहस्त्र ताल ट्रेक हा उत्तराखंडच्या गढवाल प्रदेशात 15,000 फूट उंचीवरचा एक उंच मार्ग आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या राज्यातील नऊ ट्रेकर्सचा मृत्यू झाल्याबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. डेहराडूनला पोहोचलेले महसूल मंत्री कृष्णा बायरे गौडा यांनाही त्यांनी कर्नाटकातील उर्वरित सर्व ट्रेकर्सना सुरक्षित परत आणण्याची खात्री करण्याचे निर्देश दिले आहेत.

**□निस**

पॅरीस इथं सुरू असलेल्या फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत भारताचा रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू ऍब्डेन यांच्या जोडीनं पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात त्यांनी बेल्जियमच्या सँडर गिल आणि जोरान लिगेन या जोडीवर 7-6, 5-7, 6-1 अशा सेटसमध्ये मात केली.

**क्रिके□**

आयसीसी टी-20 विश्व करंडक स्पर्धेतील आपल्या पहिल्या सामन्यात भारतानं आयर्लंडचा 8 गडी राखून पराभव केला. न्यूयॉर्कमध्ये काल रात्री झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना आयर्लंडचा संघ 16 षटकांत 96 धावा करु शकला. हार्दिक पंड्यानं तीन तर जसप्रीत बुमराहनं दोन गडी बाद केले. भारतानं तेराव्या षटकात दोन गड्यांच्या मोबदल्यात हे लक्ष्य पार केलं. कर्णधार रोहित शर्मानं 52 तर रिषभ पंतनं 36 धावा केल्या. यानंतर भारताचा सामना पाकिस्तानसोबत 9 तारखेला तर सह-आयोजक अमेरिकेसोबत 12 तारखेला होणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**